सोलापूर महानगरपालिका

सामान्य

जा.क्र.सआास/कक्ष-1/आस्था-2/१५२९

सोलापूर

प्रशासन विभाग,

दि.०९/12 /2020

**-: जाहिरात :-**

**WALK - IN- INTERVIEW**

**दि. 14/12 /2020, वेळ दुपारी 03.00 वाजता**

**(अर्ज स्विकारण्याची वेळ:- 10 ते 12.00)**

**स्थळ :- सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन, सोलापूर.**

सोलापूर महानगरपालिकेच्या विविध विभागाकडे खालील तक्त्यातील विविध पदनामचे पदे सहा महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात खालील शैक्षणिक पात्रताधारण करणा-या पात्र उमेदवारांकडून Walk - in-Interview व्दारे करार पध्दतीने भरण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | एकवट मानधन |
|---|---|---|---|---|
| 1 | स्थापत्य अवेक्षक | 15 | 1. मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवीधर (BE-Civil)<br>2. समतुल्य पदावरील किमान कामाचा दोन वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>3. उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांना प्राधान्य | 20,000/- प्रति माह |
| 2 | पशु वैद्यकिय अधिकारी | 1 | बी.व्ही.एस.सी. ॲन्ड ए.एच.अथवा एम.व्ही.एस.सी (मेडीसीन) व किमान तीन वर्षाचा कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | 20,000/- प्रति माह |

उपरोक्त तक्त्यातील पदे भरण्याबाबतचे सर्व शर्ती, अटी व जाहिरात www.solapurcoroportion.gov.in या संकतस्थळावर उपलब्ध आहे.

Digitally signed by
P.SIVASANKAR
Date:Tue Dec 08 20:23:03 IST 2020
Reason: Approved

<u>सोलापूर महानगरपालिका</u>

पशुवैदयकिय अधिकारी या पदासाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करिता <u>खालीलप्रमाणे शर्ती व अटी राहतील.</u>

1. वयोमर्यादा :- दि.01/12/2020 रोजी 38 वर्षापेक्षा जास्त असू नये. मागासवर्गीय उमेदवारांसाठी 43 वर्षापेक्षा जास्त असू नये.उच्च व जादा शैक्षणिक पात्रता धारण करणा-या उमेदवारांसाठी वयाची अट शिथिल करण्याचा अधिकार आयुक्त, सो.म.पा. यांचे कडे राहील.
2. आपली नियुक्ती ही एकवट मानधनावर असून पुर्णवेळ काम करण्याच्या अटीवर राहिल. सहा महिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल यांची नोंद घ्यावी.
3. आपली नियुक्ती ही सोलापूर महानगरपालिकेच्या अखत्यारितील म.गांधी प्राणीसंग्रहालय येथील प्राणी संग्रहाल संचालक यांचे मार्गदर्शन व सुचनेनुसार पशु,पक्षी, व प्राणी यांचे आरोग्य व इतर देखरेख व औषधोपचार तसेच कत्तलखाने येथील लहान व मोठया जनावराची शासकिय नियमाप्रमाणे तपासणी करणे.
4. सदरचे पदावर करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती असल्याने, भविष्यात म.न.पा.कडे सदर पदावर हक्क सांगता येणार नाही व नोकरीत कायम करणेबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.
5. नियमित शासकीय कर्मचा-याप्रमाणे अन्य कोणतेही लाभ, वेतनश्रेणी, रजा,पेन्शन इत्यादी अनुज्ञेय असणार नाही. आपली नियुक्ती ही करार तत्वावर व 20,000/- या एकवट मानधनावर राहील.
6. नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन केल्यास अथवा आपले कामकाज असमाधानकारक असल्यास आपली नियुक्ती कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्यात येईल. त्यासाठी नियुक्तीपत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही.
7. सदरचे नियुक्ती पत्र मिळालेपासून सात दिवसांचे आत कामावर रुजू व्हावे लागणार आहे. सदरचे नियुक्तीपत्र मिळूनही आपण सबळ कारणामुळे हजर होऊ शकत नसाल व ती कारणे मा.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचे समाधान करु शकत नसतील तर आपले नांव निवड यादीतून कमी करण्यात येईल व त्यानंतर नेमणुकीबाबत आपल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही,अशा स्थितीत प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांची निवड करण्यात येईल.
8. आपणास करारातून मुक्त व्हावयाचे असल्यास किमान 30 दिवसांची पूर्व सुचना नियुक्ती प्राधिका-यास देणे अथवा तीस दिवसाचे एकवट मानधन रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे जमा करणे आवश्यक राहील.
9. मा.शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही - 2010/प्र.क्र.17/2000/12 दि.1 जुलै 2005 नुसार कुंटुंबांची अट लागू असून त्यानुसार दि.28 मार्च 2005 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असू नये. सदर नियमाचे प्रतिज्ञा पत्र नमुना 'अ' नुसार उमेदवारांने सादर करावयाचे आहे.
10. संबंधीत उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी पोलीस यंत्रणेमार्फत करुन करून घेण्यात येईल.
11. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी त्यांच्या संपूर्ण परिचयपत्र, सर्व आवश्यक कागदपत्रांच्या एक सांक्षाकिंत प्रती, पासपोर्ट साईज फोटो व मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह वरील नमूद तारखेस सकाळी 10 ते 12 या वेळेत अर्ज सादर करावा.
12. उमेदवारांनी मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहणेचे आहे.
13. स्थानिक परिस्थितीनुसार शर्ती व अटी बाबत आयुक्त, सो.म.पा.यांचा निर्णय अंतिम राहील सदर व इतर शर्ती व अटी सो.म.पा.च्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिले आहे.
14. कोणतेही कारण न देता निवड प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे/रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, सो.म.पा. यांना राहातील.
15. नियुक्तीसाठी कसल्याही प्रकारचा दबाव/गैरमार्गाचा अवलंब केल्यास उमेदवारी कोणत्याही टप्पावर कसलीही कल्पना न देता रद्द करण्यात येईल व त्याबद्दल कसलीही तक्रार करता येणार नाही.
16. सदरची नियुक्ती ही केवळ ठरावविक कालावधी करीता व नमूद एकवट मानधनावर करार पध्दतीने असल्याने नियुक्ती पूर्वी रु.100/- च्या स्टॅम्प पेपरवर करार पत्र करुन दयावे लागेल.

Digitally signed by
P.SIVASANKAR
Date:Tue Dec 08 13:35:26 IST 2020
Reason: Approved

सोलापूर महानगरपालिका

**अवेक्षक या पदासाठी खालीलप्रमाणे शर्ती व अटी राहतील.**

1. दि.01/12/2020 रोजी उमेदवाराचे वय खुला प्रवर्गासाठी 38, मागास प्रवर्गासाठी 43 अशी असून याकरीता वयाचा पुरावा जोडणे आवश्यक राहिल.
2. अर्ज सादर करताना सोबत जोडलेली शैक्षणिक अर्हतेचे व अनुभवाचे कागदपत्रे स्पष्ट दिसतील असे जोडण्यात यावे. खाडाखोड असलेली कागदपत्रे वैध धरली जाणार नाही.
3. सदर पदावरील नियुक्तीही तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्याच्या कालावधीकरिता असून पूर्णवेळ काम करणेच्या अटीवर राहील. सहा महिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल.
4. याकामी करारपध्दतीने दरमहा रुपये 20,000/- इतके एकवट मानधन दिले जाणार असून याव्यतिरिक्त अन्य कोणतेही आर्थिक फायदे लागू राहणार नाही.
5. आपली नियुक्तीही सोलापूर महानगरपालिकेच्या अखत्यारितील विविध विभागाकडे काम पाहण्याकरीता असेल. तसेच याशिवाय वरिष्ठ अधिका-याकडून वेळोवेळी सांगतील ती कामे व कर्तव्ये पार पाडावी लागतील.
6. सदरचे पदावर करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती असल्याने, भविष्यात म.न.पा.कडे सदर पदावर हक्क सांगता येणार नाही. व नोकरीत कायम करणेबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.
7. नियमित शासकीय कर्मचा-याप्रमाणे अन्य कोणतेही लाभ, वेतनश्रेणी, रजा,पेन्शन इत्यादी अनुज्ञेय असणार नाही. आपली नियुक्तीही करार तत्वावर व फक्त एकत्रित मानधनावर आहे.
8. नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन केल्यास अथवा आपले कामकाज असमाधानकारक असल्यास आपली नियुक्ती कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्यात येईल. त्यासाठी नियुक्तीपत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही.
9. सदरचे नियुक्ती पत्र मिळालेपासून सात दिवसांचे आत कामावर रुजू व्हावे लागणार आहे. सदरचे नियुक्तीपत्र मिळूनही आपण आपण जर अन्य ठिकाणी नोकरीस असेल तर त्या संस्थेचा/कार्यालयाचा राजीनामा स्विकृत केल्याचा पुरावा हजर करणे बंधनकारक आहे.
10. सदरचे नियुक्ती पत्र मिळालेपासून सात दिवसांचे आत कामावर रुजू व्हावे लागणार आहे. सदरचे नियुक्तीपत्र मिळूनही आपण सबळ कारणामुळे हजर होऊ शकत नसाल व ती कारणे आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचे समाधान करु शकत नसतील तर आपले नांव निवड यादीतून कमी करण्यात येईल व त्यानंतर नेमणुकीबाबत आपल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
11. आपणास करारातून मुक्त व्हावयाचे असल्यास किमान 30 दिवसांची पूर्व सुचना नियुक्ती प्राधिका-यास देणे अथवा तीस दिवसाचे एकवट वेतन (पगाराची) रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे जमा करणे आवश्यक आहे.
12. आपण सादर केलेली कागदपत्राच्या सत्येतेबाबत प्रश्न उपस्थित झाल्यास आपली नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
13. सदरची नियुक्तीही तात्पुरत्या स्वरुपात करार तत्वावर राहील. सदरचे करार पत्र रु.100/- चे स्टॅम्प पेपरवर सर्व शती व अटी मान्य असलेबाबत लिहून दयावे लागेल.
14. निवड प्रक्रिया कोणत्या टप्प्यावर स्थगित करणे किंवा बदल करणेचे, तसेच शर्ती व अटीमध्ये शिथिलता करण्याचे अधिकार आयुक्त, सो.म.पा. यांना राहिल. याबाबत कोणतेही वाद उपस्थित करता येणार नाही.
15. भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार तसेच भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे इ.अधिकार आयुक्त, सो.म.पा. यांनी राखुन ठेवला आहे.

Digitally signed by
P.SIVASANKAR
Date:Tue Dec 08 13:36:49 IST 2020
Reason: Approved

## अर्जाचा नमुना

सोलापूर महानगरपालिका सोलापूर ------------------------------------------------ या पदासाठी अर्ज

| उमेदवाराचा नजीकच्या काळातील (रुंदी ३०.५ से.मी.व उंची ४.५ से.मी.) आकाराचा फोटो चिकटवून स्वत: साक्षांकित करावा |
|---|

प्रति,

**मा.आयुक्त सो**

सोलापूर महानगरपालिका,

मुख्य कार्यालय डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,

आप्पासाहेब वारद पथ,

रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१

**संपूर्ण नाव मराठी इंग्रजी (कॅपिटल लेटर)**

**१) संपूर्ण नाव** **मराठी** **इंग्रजी**

१) आडनाव ------------------ ------------------

२) स्वत:चे नाव ------------------ ------------------

३) वडिलांचे/पतिचे नाव ------------------ ------------------

४) आईचे नाव ------------------ ------------------

**२) पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता** ---------------------------------- ------------------

**पिन कोडसह** ---------------------------------- ------------------

**संपर्क साठी दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रं.** ---------------------------------- ------------------

**३) जन्म तारीख - दि.०१/१२/२०२० रोजीचे वय**

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |
| | | |

| ४) जात- प्रवर्ग |
|---|
| |

**५) शैक्षणिक अर्हता**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापिठ /मंडळाचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी व श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

**६) अनुभव**

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकूण वर्षे |
|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | |
| | | | |
| | | | |
| | | | |

७) अवगत असणा-या भाषा (योग्य ठिकाण अशी खूण करावी)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

८) आपणा विरुध्द न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी ,शिस्तभंगाविषयी प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे काय?(असल्यास थोडक्यात तपशील द्यावा)

| आहे | नाही | तपशील |
|---|---|---|
| | | |

९) अर्जा सोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१) --------------------------------

२) --------------------------------

३) --------------------------------

४) --------------------------------

५) --------------------------------

१०) राष्ट्रीयत्व : भारतीय/अभारतीय

११) अर्जदार महाराष्ट्र अधिवासी आहे का? होय / नाही

मी असे प्रमाणित करतो/ करते की,वर नमूद केलेली माहिती खरी असून,ती खे ाटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल.आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण : अर्जदाराची सही -----------------------

दिनांक : ( --------------------------------- )

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना**
**प्रतिज्ञापन (विवाहित उमेदवारांसाठी) नमुना - अ (नियम ४ पहा)**

मी.श्री./श्रीमती/कु. ------------------------------------------------------श्री.------------------------------------------ यांची /मुलगा/मुलगी/पत्नी/वय ---------- वर्षे,राहणार ----------------------- याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/ करते की,

१) मी ---------------------------- या पदसाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला --------- इतकी हयात मुले आहेत,त्यापैकी २८ मार्च २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ---------- आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि.२८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या,मुलामुळे या पदासाठी मी अनर्हत ठरविण्यास पात्र होईल,याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची सही ----------------------